PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 8, ISSUE 3

# भारतातील बेरोजगारीच्या वाढीचे कारणे व उपाय

**प्रा. लोडे परमेश्वर लिंबाजी**
आदर्श महाविद्यालय, हिंगोली
गिलोरी पो. नर्सी, ता. जि. हिंगोली
महाराष्ट्र भारत

## प्रस्तावना:-

बेरोजगारी हा कोणत्याही देशाच्या विकासात एक अडथळा आहे. बेरोजगारी हा भारतामध्ये एक गंभीर प्रश्न आहे. बेरोजगारी हा कोणत्याही देशासाठी किंवा समाजासाठी एक शाप आहे. त्यामुळे दारिद्र्य वाढ होते. उपासमारी मध्ये वाढ होते. तरुणांमध्ये असंतोष वाढतो. यातून चोरी, हिंसाचार, गुन्हेगारी, आत्महत्या यासारख्या समस्यामध्ये वाढ होते. बेरोजगारी एक भयंकर विष आहे. बेकारीने संपूर्ण देशाचे आर्थिक, सामाजिक, राजकीय, जीवन दुषित केले आहे. त्यामुळे त्यांची कारणे शोधून काढणे महत्त्वाचे आहे. व ही समस्या संपविण्यासाठी भारत सरकारने प्रभावी पावले उचलणे गरजेचे आहे.

## उद्दिष्टे:-

1) भारतातील बेरोजगारीच्या कारणाचा अभ्यास करणे.

2) देशातील बेरोजगारी कमी करण्यासाठी उपाय सुचविणे.

## संशोधन पध्दती:-

सदर संशोधन लेख लिहण्यासाठी व्दितीय सामुग्रीचा आधार घेण्यात आला आहे. ही व्दितीय सामुग्री प्राप्त करण्यासाठी विविध पुस्तक, संशोधन लेख, विविध संकेत स्थळे, वर्तमान पत्रांचा वापर करण्यात आला आहे.

**बेरोजगारीची व्याख्या व अर्थ:-**

बेकारी म्हणजे एखाद्या व्यक्ती प्रचलित वेतन दरावर कार्य करण्यास इच्छुक आहे. पण त्या व्यक्तीला काम मिळत नसेल तर त्याला बेकार म्हणतात.

**1. प्रा. पिगु:-**

एखाद्या व्यक्तीला तेव्हाच बेरोजगार म्हणता येईल जेव्हा त्याच्याकडे कोणतेही काम नसेल पण तो काम करण्यासाठी इच्छुक असेल.

**2. शाफिन तथा ग्रेगोरी-**

एक बेरोजगार व्यक्ति म्हणजे अशी व्यक्ती होय. 1. वर्तमान काळात जिच्याकडे कोणतेही काम नाही. 2. वर्तमान मजूरी दरावर कार्य करण्यासाठी तयार आहे. 3. कामाचा शोध घेत आहे अशा व्यक्तीला बेरोजगार म्हणावे.

**बेरोजगारीचे कारणे:-**

भारतात बेरोजगारीचे अनेक कारणे आहेत. त्यातील काही प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे

**1. लोकसंख्या वाढ:-**

बेरोजगारीचे प्रमुख कारण म्हणजे भारतातील लोकसंख्येत झालेली वाढ होय. भारत स्वातंत्र्य झाल्याच्या नंतर भारतातील लोकसंख्येत मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. देशातील वाढत्या लोकसंख्येबरोबर देशातील रोजगार निर्मितीमध्ये त्या प्रमाणात वाढ करण्यात आली नाही त्यामुळे बेरोजगारीची समस्या गंभीर बनत गेली.

**2. सदोष शिक्षण व्यवस्था:-**

भारतीय शिक्षण पध्दतीमध्ये अनेक प्रकारचे दोष आहेत. भारतीय शिक्षण पध्दतीमध्ये पुस्तकी ज्ञानावर भर दिला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यावहारिक ज्ञान विकसीत होत नाही. त्यामुळे या शिक्षण पध्दतीतून व्यक्ती फक्त शिक्षित होऊ शकतो पण सक्षम होत नाही. त्यामुळे देशात सुशिक्षीत बेरोजगाराचे प्रमाण अतिशय जास्त वाढलेले दिसून येतात.

**3. औद्योगिक विकासाचा कमी वेग:-**

देशातील औद्योगिकीकरणाचा वेग बघितला तर तो अतिशय कमी आहे. त्यामुळे रोजगार निर्मितीही कमी होते. रोजगार निर्मितीमध्ये वाढ करण्याची असेल तर देशातील उद्योग व व्यवसायाचा विकास करणे गरजेचे आहे. उद्योगाच्या माध्यमातून मोठया प्रमाणात रोजगार निर्मिती होत असते व त्यातून मोठया प्रमाणात बेरोजगारीचे प्रमाण कमी होऊ शकते.

**4. मागास कृषी क्षेत्र:-**

देशातील मोठया प्रमाणात शेती ही आजही निसर्गावर अवलंबून आहे. त्यामुळे कृषी क्षेत्रात मोठया प्रमाणात बेकारी दिसून येते. कृषी क्षेत्रात प्रामुख्याने छुपी बेरोजगारी दिसून येते. कृषी क्षेत्रात मागास असल्यामुळे रोजगार निर्मिती होत नाही व त्यामुळे बेकारीचे प्रमाण वाढते.

5. कुशल आणि प्रशिक्ष्िितांची कमतरता:-

आपल्या देशात कुशल आणि प्रशिक्षित लोकांची कमतरता आहे. म्हणून उद्योग चालविण्यासाठी प्रशिक्षित कामगार परदेशातून बोलवावे लागतात. देशात प्रशिक्षित व्यक्तीच्या कमतरतेमुळेही मोठया प्रमाणात बेकारी वाढ होते.

**बेरोजगारी कमी करण्यासाठी उपाय योजना:-**

1. सरकार मार्फत रोजगार निर्मितीसाठी चालविण्यात येणाऱ्या योजनांची कडक अंमलबजावणी करणे गरजचे आहे.
2. देशातील वाढती लोकसंख्या नियंत्रीत करणे गरजेचे आहे. कुटूंबनियोजन कार्यक्रमाची योग्य अंमलबजावणी करणे.

3. कृषी क्षेत्राचा विकास घडवून आणणे व कृषी क्षेत्रात रोजगार वाढ घडवून आणण्यासाठी खते, बि-बियाणे, सिंचनाच्या सोईत वाढ घडवून आणणे.
4. माफक व्याजदराने कर्ज, करविषयक सवलती, तांत्रिक शिक्षणक्रम औद्योगिक विकासाच्या दृष्टिने अत्यावश्यक असणाऱ्या सेवासुविधांचा पुरवठा इत्यादीच्या सोईत वाढ करणे.
5. ग्रामीण भागात उद्योग स्थापन करुन आणि उत्पन्नदायी सोई उपलब्ध करुन देऊन त्याच ठिकाणी रोजगार निर्मिती करणे.
6. भारतीय शिक्षण पध्दतीमध्ये आमुलाग्र बदल घडवून आणणे, तांत्रिक व कौशल्य शिक्षणावर भर देणे.

## सारांश:-

सध्याच्या कालखंडामध्ये भारतामध्ये बेरोजगारीची प्रमुख समस्या आहे. या बेरोजगारीच्या समस्येवर वेळीच उपाययोजना करणे गरजेचे आहे. भारतात ग्रामीण भागाप्रमाणेच शहरी भागातही बेरोजगगारीचे प्रमाण अतिशय जास्त आहे. बेरोजगारी निर्मुलनासाठी सरकारच्या माध्यमातून कठोर पावले उचलणे गरजचे आहे.

## संदर्भ ग्रंथ:-

1. भारतीय अर्थव्यवस्था – डॉ. सौ. निर्मल भालेराव
2. भारतातील बेरोजगारी आणि रोजगाराचा एकक- डॉ. जे.एफ. पाटील, डॉ. व्ही.बी. ककडे
3. भारतीय अर्थव्यवस्था – किरण जी देसले
4. https://marathisky.com
5. https://www.nitinsir.in